| | | | |
|---|---|---|---|
| MHRG160002582024 | खटला दाखल तारीख | : | २०.१२.२०२४ |
| | खटला नोंदणी तारीख | : | २०.१२.२०२४ |
| | खटला निकाल तारीख | : | १०.०३.२०२६ |
| | कालावधी | : | **वर्ष महिने दिवस** |
| | | | ०१ ०२ २१ |

**<u>मे. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाली–सुधागड यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी श्री.रा.अ.शिवरात्री )

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१२४/२०२४.**

**निशाणी क्र. १५/ब.**

(पहिली खबर क्र.१४७/२०२४,
पाली पोलीस ठाणे)

भाग अ
(para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | :: | **महाराष्ट्र शासनतर्फे पाली पोलीस ठाणे** |
| **प्रतिनिधीत्व** | :: | **सरकारतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एस. म्हात्रे,** |
| **आरोपी** | :: | **आशा अनंत पवार,**<br>वय–४५ वर्षे, व्यवसाय–मोलमजुरी,<br>रा. वाघोशी आदिवासीवाडी, ता.सुधागड, जि.रायगड |
| **प्रतिनिधीत्व** | :: | **आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती अक्षरा देशमुख,** |

भाग ब

(para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ०३.११.२०२४ |
| प्रथम माहिती अहवाल नोंद दिनांक | ०३.११.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २०.१२.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०३.०२.२०२५ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ११.०६.२०२५ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | १२.०८.२०२५ |
| निकाल राखून ठेवल्याची दिनांक | --- |
| निकालाचा दिनांक | १०.०३.२०२६ |
| शिक्षा झाल्याचा दिनांक | --- |

**<u>आरोपीचा तपशील</u>**

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटण्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष असो वा दोषी | चौकशी दरम्यान तुरुंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| **आशा अनंत पवार,** | भा.ना.सु. संहिता २०२३ चे कलम | - | महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५- ई अन्वये | **निर्दोष** | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ३५(३) प्रमाणे नोटीस | | | | |

भाग क

(para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## अभियोग पक्ष/बचावपक्ष/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष –

| अनु.क्र. | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| ०१. | रमेश गौरव पवार | ०८ लगत | पंच |
| ०२. | लक्ष्मण शंकर निकम | ०८ लगत | पंच |
| ०३. | ऋषाली यशवंत माण्टे | ०८ लगत | फिर्यादी |
| ०४. | राम मारुती पवार | ०८ लगत | साक्षीदार |

### ब.बचावाचे साक्षीदार, जर असतील तर –

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| – | | |

### क.न्यायालयाचे साक्षीदार, जर असतील तर –

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | - | |

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयाचे साक्षीदारांनी सिध्द केलेल्या कागदपत्रांची यादी.**

**अ.अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | १०,अ.सा.क्र.०१ | पंचनामा |
| ०२. | ११,अ.सा.क्र.०३ | फिर्याद |

**ब.बचावाचे निशाणी क्रमांक–**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | |

**क.न्यायालयाचे निशाणी–**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | - | |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | |

## –:: न्यायनिर्णय ::–

(दिनांक १०/०३/२०२६ रोजी पारीत)

अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि गुन्हयाचा तपशील पाहता, खालील मुद्दा माझे विचारार्थ निर्माण झाला. त्या मुद्दयाचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०३/११/२०२४ रोजी २०.१४ वाजण्याच्या दरम्यान मौजे वाघोशी आदिवासीवाडी येथे रस्त्याला, ता.सुधागड जि.रायगड येथे आरोपी एका सफेद रंगाच्या प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये २० लीटर हातभट्टीची तयार दारु स्वतःच्या फायद्याकरीता विनापरवाना बेकायदेशीररित्या विक्रि करण्याच्या उद्देशाने स्वत:च्या ताब्यात बाळगलेल्या स्थितीत मिळून आला ? | **..नाही..** |
| २. | कोणता आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## –::कारणमीमांसा::–

**मुद्दा क्र.०१:–**

०२. प्रस्तुतचा गुन्हा अभियोगपक्षाने मुंबई दारुबंदी कायदा कलम अधिनियम १९४९ चे कलम ६५–ई अन्वये दाखल करण्यात आले आहे. वैशाली मान्टे (अ.सा.३) यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात नमुद केले की, पोसई पवार यांना दि.०३.११.२०२४ रोजी गुप्त बातमी प्राप्त झाली व वाघोशी आदिवासीवाडी येथे अवैध दारु विक्री होत असल्याची माहिती प्राप्त झाली. पोसई पवार, पोलीस कर्मचारी घाडगे, गोरे व ते शासकिय वाहनाने वाघोशी आदिवासीवाडी येथे गेले असता दोन पंचांना बोलावुन रस्त्याने वाघोशी आदिवासीवाडी येथे गाडी ठेवुन रस्त्याने चालत गेले असता, आशा आनंत पवार हिच्या घराचा शोध घेतला. सदरची महिला तिच्या घराचे पाठीमागे मळकट रंगाची बादली घेऊन बसलेली दिसली तिचा संशय आल्याने त्या महिलेस म.पो. मान्टे (अ.सा.३) यांनी स्वत: पकडले असे नमुद केले. त्या बादलीमध्ये हातभट्टीची दारु होती असे नमुद केले. त्या बादलीतील द्रव्य पदार्थ १८० मि.ली बाटली मध्ये सिलबंद केले. पंचनामा पोसई पवार यांनी केला असे नमुद केले व सदर घटनेची फिर्याद नोंदविली असे नमुद केले. त्यांच्या उलटतपासादरम्यान ज्या वाहनाने घटनास्थळी गेले त्याचे वर्णन फिर्यादीत नमुद नसल्याचे त्यांनी नमुद केले. त्यांनी वाघोशी आदिवासीवाडी येथे चार चाकी वाहन जाते असे नमुद केले. त्यांनी जप्त केलेल्या बादली सारखी बादली बाजारात सहज उपलब्ध होत असल्याचे नाकारले व घटनास्थळी कोणीही ग्राहक आढळून आले नाही असे नमुद केले.

०३. राम पवार (अ.सा.४) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये दि.०३.११.२०२४

रोजी सदर गुन्हाचा तपास त्यांच्याकडे सोपविला व ते स्वत: देखील छाप्यादरम्यान उपस्थित होते असे निदर्शनास येते. दि.०३.११.२०२४ रोजी वाघोशी आदिवासीवाडी येथील पश्चिमेला विहिरीच्या बाजुला एक महिला गवता लगत मळकट रंगाची बादली घेऊन बसलेली दिसली. तिला म.पो. मांन्टे यांनी धावत जावुन पकडले व तिच्याकडे २० लिटर दारु व मळकट रंगाची बादली प्राप्त झाली. सदरच्या जप्त केल्या दारुमधील १८० मि.लि. दारु एका वेगळया बादलीमध्ये सिलबंद करण्यात आले. त्यांनी पंचनामा केल्याचे नमुद केले. त्यांच्या उलटतपासादरम्यान वाघोशीवाडी व घोडपापडवादी येथून येण्यासाठी अर्धातासाचा वेळ लागतो असे नमुद केले. त्यांनी घटनास्थळ खुले व मोकळे होते असे नमुद केले.

०४. रमेश गौरव पवार (अ.सा.१) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये दि.०३.११.२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना वाघोशी आदिवासी वाडी येथे बोलावले होते असे नमुद केले व तेथे जात असताना एक महिला पिशवी घेऊन बसलेली दिसली असे कथन केले. पिशवी तपासली असता त्यामध्ये मद्य पदार्थ आढळून आले असे नमुद केले व राम पोलीसांनी पंचनामा तयार केला असे नमुद केले. त्यांच्या उलटतपासादरम्यान त्यांनी नमुद केले की, पंचनाम्यामध्ये एक महिला पिशवी घेऊन बसलेली दिसली असा मजकुर दिसुन येत नाही असे त्यांनी नमुद केले. पंचनाम्यातील मजकुर न वाचता त्यांनी पोलीसांनी सांगितल्या प्रमाणे सही केली असे नमुद केले.

०५. लक्ष्मण शंकर निकम (अ.सा.२) यांनी दि.०३.११.२०२४ रोजी घोडपापडवाडी येथे राम पोलीसांनी बोलाविले होते त्यांनी सही करायला सांगितले होते त्यामुळे सही केली असे सांगितले. त्यांनी पंचनाम्यातील मजकुर त्यांना वाचुन

दाखविला नाही असे नमुद केले.

०६. प्रस्तुतची घटना ही गुप्त बातमीद्वारे वाघोशी आदिवासीवाडी येथे पोलीस कर्मचारी पंचांमसक्ष घटनास्थळी गेले असे नमुद केले. त्यास पोलीस कर्मचारी पुष्टी देतात. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीस फिर्यादी स्वत: पुष्टी देतात व तपासणी अधिकारी राम पवार पुष्टी देतात फिर्यादी व तपासणी अधिकारी यांच्या पुराव्याचे अनुषंगाने आशा आनंत पवार हिच्या ताब्यात एक बादली मिळून आली व त्या बादलीत देशी दारु मिळुन आली असे नमुद करतात. सदरची छापा कारवाई होत असताना पंच साक्षीदार राम पवार (अ.सा.१) व (अ.सा.२) हे त्यांच्या समवेत होते असे नमुद केले. राम पवार (अ.सा.१) यांनी एक महिला पिशवी घेऊन बसली होती असे नमुद केले. तर लक्ष्मण निकम (अ.सा.२) यांनी पंचनाम्यातील मजकुर वाचुन दाखविला नाही असे नमुद केले. पंचांसमक्ष पंचनामा केला या बाबीस संशय निर्माण होतो. तसेच जप्त केले द्रव्य पदार्थ हे दारु होते या बाबत संशय निर्माण होतो. पोलीस कर्मचा–यांनी केलेली कारवाई हि स्वतंत्र साक्षीदारां समक्ष केली यावर संशय निर्माण होतो. त्यामुळे आरोपीकडून देशी दारु मिळुन आली हि बाब सशंया पलिकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, मुद्दा क्र.१ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.०२ :–</u>**

०७. मुद्दा क्र.०१ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदविल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. म्हणून, मी मुद्दा क्र.०२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## :: आदेश ::

०१. महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५–ई या शिक्षेस पात्र असणा–या अपराधामधुन या खटल्यातील आरोपी **आशा अनंत पवार ,** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

०३. सदर गुन्ह्यात जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट अपिल अथवा अपिल कालावधी संपल्यानंतर मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढुन घेतलेल्या वस्तू (विल्हेवाट) नियमन, १९५३ मधील तरतुदीस अधिन राहुन करावी.

०४. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया कलम ४३७–ए अन्वये अपील कालावधी पर्यंत जामीन १५०००/– रुपयाचा दयावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

SHIVRATRI RAJU ASHOK

Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2026.03.10 15:58:35 +0530

**ठिकाणः पाली.** **(रा.अ.शिवरात्री)**

**दिनाकः १०/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पाली**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | Ankush S. Waghmare |
| (b) | Court Name | CJJD & JMFC, Pali |
| (c) | Judgment signed by P.O.on | 10.03.2026 |
| (d) | Judgment uploaded on | 11.03.2026 |